**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाववद्यालय, राजगुरुनगर

## शैक्षणीक वर्ष 2021-2022

## अर्थशास्त्र विभाग

महाविद्यालयाच्या कला शाखेतील अर्थशास्त्र विभागामध्ये शिक्षणासोबतच विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक वर्ष 2021-2022 मध्ये अर्थशास्त्र विभागात प्रथम वर्ष कला या वर्गात 120 विद्याथी, द्वितीय वर्ष कला या वर्गात 17 विद्याथी, ततृीय वर्ष कला या वर्गात 10 विद्याथी असे एकूण 147 विद्यार्थ्यानी प्रवेश घेतला.

कला शाखेत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी सोबतच त्यांच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी इतर नावीन्यपूर्ण उपक्रम देखील घेण्यात आले. प्रथम सत्रातील अंतर्गत मूल्यमापन ऑक्टोबर ते नोव्हेंबर 2021 या कालावधीत पूर्ण झाले. 10 गुणांची Assignment तसेच 20 गुणांची लेखी परीक्षा घेऊन हे मूल्यमापन करण्यात आले. तसेच अर्थशास्त्र विभागात विद्यार्थ्यांची गुणवत्ता पडताळण्यासाठी सराव परीक्षा देखील घेतल्या जातात. द्वितीय सत्रातील अंतर्गत मुल्यमापन मार्च ते एप्रिल 2022 या कालावधीत पूर्ण झाले. 10 गुणांची Assignment तसेच 20 गुणांची लेखी परीक्षा घेऊन हे मूल्यमापन करण्यात आले.

अशा रीतीने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी अर्थशास्त्र विभाग नेहमीच प्रयत्न करत आला आहे